अलीकडच्या काळात बिबट्यांचे चित्र दिसून येत आहे.



# आर. पी. गोयंका फाऊंडेशनतर्फे के. के. वाघच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

## १४५ विद्यार्थ्यांनी घेतले २०० तासांचे प्रशिक्षण

**नाशिक : प्रतिनिधी**

के के वाघ शिक्षण संस्था संचलित के के वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय येथे रामा प्रसाद गोयंका ग्रुप अर्थात आरपीजी फाऊंडेशनच्या झेन्सार टेक्नॉलॉजीतर्फे महाविद्यालयाच्या तिसऱ्या वर्षातील १४५ विद्यार्थ्यांसाठी सुमारे २०० तासांची मोफत प्रशिक्षण कार्यशाळा पार पडली. या सर्व प्रशिक्षित विद्यार्थ्यांना झेन्सार टेक्नॉलॉजीचे ईएसडी ट्रेनिंग प्रोग्रॅम हेड गुरुराज कुलकर्णी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

त्यामध्ये कॉम्प्युटर प्रोग्रामिंग, सॉफ्ट स्किल्स, ॲप्टिट्यूड टेस्ट, लीडरशिप तसेच मुलाखत कशी द्यावी व मुलाखतीची तयारी कशी करावी याचे प्रशिक्षण देण्यात आले. याप्रसंगी औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञ मान्यवरांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचा उद्देश हा विद्यार्थ्यांना कौशल्य व व्यक्तिमत्त्व विकास करणे होय. प्लेसमेंट विभागामार्फत प्रथम ते अंतिम वर्षात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कौशल्य वाढीसाठी वर्षभर विविध उपक्रम व कार्यशाळा राबविण्यात येत असतात. त्यामध्ये बायोडेटा लेखन, ॲप्टिट्यूड मॉक टेस्ट्स, मॉक इंटरव्ह्यू आणि सीईओ कनेक्ट आदी उपक्रमांचा समावेश असतो. के के वाघने सन २०१८ सालापासून आरपीजी फाऊंडेशन सोबत सामंजस्य करार केला आहे. आतापर्यंत ५ बॅचेसमध्ये ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण कार्यशाळेचा लाभ घेतलेला आहे. वाघ संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, सर्व विश्वस्त मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी, विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने, डॉ. पी. डी. भामरे व सर्व विभाग प्रमुख यांनी आरपीजी फाऊंडेशनचे आभार मानले.